## तरुणाला मोटारीने चिरडले

**मुंबई :** दक्षिण मुंबईतील बाबूलनाथ परिसरात मर्सिडीज मोटरगाडीने पदपथावर झोपलेल्या २५ वर्षीय तरुणाला चिरडल्याने त्याचा मृत्यू झाला. या प्रकरणातील आरोपी चालक घटनास्थळावरून पळून गेला असून पोलिसांकडून तपास सुरू आहे. मृत तरुणाची ओळख जगदीश उर्फ जग्गू अशी आहे. धारावीतील रहिवासी आणि महापालिकेच्या 'डी' वॉर्डमध्ये सफाई कामगार म्हणून कार्यरत असलेल्या पार्वती अर्जुन कल्याण (३९) यांनी या प्रकरणी पोलिसात तक्रार दाखल केली.

## मदरशातून मुलाचे पलायन

**मुंबई :** गोरेगावमधील एका मदरशातून ११ वर्षीय मुलाने पलायन केले आहे. मुलाचे अपहरण झाल्याची तक्रार त्याच्या वडिलांनी केली आहे. गोरेगाव पोलिसांनी या प्रकरणी अपहरणाचा गुन्हा दाखल केला असून या मुलाचा शोध घेत आहे. हा मुलगा स्वतःहून पळून गेला असण्याची शक्यता पोलिसांनी वर्तवली आहे. अरमान राईन (३४) याचा हा मुलगा गोरेगावच्या मोतीलाल नगर येथील एसडीआय एज्युकेशन सेंटर या मदरसामध्ये शिक्षण घेत आहे.

# ठाण्यातील घरासाठी दुप्पट किंमत

## २० टक्के योजनेतील विकासकांकडून विजेत्यांची फसवणूक

**मंगल हनवते, लोकसत्ता**

**मुंबई :** म्हाडाच्या विविध मंडळाकडून काढलेल्या सोडतीतील २० टक्के सर्वसमावेशक योजनेतील विजेत्यांची विकासकांकडून मोठी आर्थिक फसवणूक होत असल्याची बाब म्हाडाच्या दक्षता विभागाच्या चौकशीतून समोर आली आहे. ठाण्यातील एका विकासकाने १५ लाखांच्या घरांसाठी विजेत्यांकडून थेट ३३ लाख ८० हजार ९६८ रुपये अशी किंमत आकारली आहे.

दुसरीकडे पुण्यातील विकासकांची मुजोरी सुरूच असून विजेत्यांना २० टक्के योजनेतील घरे परवडत नसल्याने २०२१ ते २०२५ या काळात सोडतीतील १२ हजार ४५८ विजेत्यांपैकी ३ हजार ८०५ विजेत्यांनी घरे परत केल्याची बाबही चौकशीतून समोर आली आहे. त्याचवेळी पुणे मंडळातील एका वरिष्ठ अधिकाऱ्याने तसेच एका विकासकाने संगनमत करत खोटी देकार पत्रे तयार करत सोडतीतील २० टक्के योजनेतील विकली न गेलेली तीन घरे सोडतीत अयशस्वी ठरलेल्या अर्जदारांना वितरीत केल्याचीही माहिती उघडकीस आली आहे. याप्रकरणी अधिकारी आणि विकासकाविरोधात गुन्हाही दाखल झाला आहे.

आर्थिक दुर्बल घटकाला परवडणाऱ्या दरात खासगी विकासकाच्या प्रकल्पातील घरे उपलब्ध व्हावीत यासाठी २० टक्के योजना आणली. मात्र प्रत्यक्षात २० टक्के योजनेतील घरे सर्वसामान्यांना उपलब्ध होत आहेत, पण या घरांच्या माध्यमातून विकासकांकडून विजेत्यांची आर्थिक फसवणूक होत असल्याचेही समोर येत आहे.

म्हाडाच्या विविध मंडळाच्या सोडतीतील २० टक्के योजनेतील घरांसाठी मंडळाकडून जी किंमत आकारली जाते, त्या किमतीपेक्षा भरमसाट किंमत विकासकांकडून आकारली जात आहे. यासंबंधीच्या तक्रारींची दखल घेत गृहनिर्माण विभागाने काही महिन्यांपूर्वी म्हाडाच्या दक्षता विभागाला पुणे मंडळातील २० टक्के योजनेतील घरांच्या वितरणाच्या चौकशीचे आदेश दिले. या आदेशानुसार दक्षता विभागाकडून पुणे मंडळाच्या सोडतीतील घरांची चौकशी सुरू आहे. त्याचवेळी इतर मंडळातील विजेत्यांकडूनही तक्रारींची संख्या वाढत आहे.

दरम्यान, या विषयी अपर पोलीस महासंचालक तथा मुख्य दक्षता आणि सुरक्षा अधिकारी विनीत अग्रवाल यांना विचारले असता त्यांनी चौकशी सुरू असल्याने याबाबत आताच काही अधिक बोलता येणार नाही, असे सांगितले.



### विकासकाविरोधात कारवाईची शक्यता

ठाण्यातील एका विकासकाने १५ लाख ९१ हजार ४०० रुपयांच्या घरासाठी थेट ३३ लाख ८० हजार ९६८ रुपये अशी किंमत विजेत्यांकडून घेतली आहे. पंधरा लाख रुपयांच्या घरासह वानतळासाठी नऊ लाख रुपये आकारण्यात आले आहेत. या प्रकरणाच्या चौकशीनंतर संबंधित विकासकाविरोधात कारवाई होण्याची शक्यता आहे.

### पुण्यातील ३८०५ विजेत्यांकडून घरे परत

दुसरीकडे पुण्यातील विजेत्यांना २० टक्के योजनेतील घरे परवडत नसल्याने २०२१ ते २०२५ या काळात सोडतीतील १२ हजार ४५८ विजेत्यांपैकी ३ हजार ८०५ विजेत्यांनी घरे परत केल्याची बाबही चौकशीतून समोर आली आहे. पिंपरी-चिंचवडमधील दिघी प्रकल्पातील तीन घरे विकासक आणि पुणे मंडळाच्या मिळकत व्यवस्थापकाने संगनमताने म्हाडाची फसवणूक करून बनावट देकारपत्राद्वारे सोडतीतील अयशस्वी अर्जदारांना वितरित केल्याची बाब या चौकशीतून समोर आली आहे. याप्रकरणी संबंधित अधिकाऱ्याला निलंबित केले असून विकासक आणि अधिकाऱ्याविरोधात गुन्हा दाखल केला आहे.

## बदलापुरातील डॉक्टरला उत्तर प्रदेश 'एटीएस'कडून अटक

**बदलापूर :** दहशतवादी गुन्हे प्रकरणातील आरोपींना ऑनलाइन मार्गदर्शन केल्याचा ठपका ठेवत उत्तर प्रदेश दहशतवाद विरोधी पथकाने (एटीएस) बदलापुरातून एका डॉक्टरला अटक केल्याची माहिती सूत्रांनी दिली. डॉ. ओसामा म. शेख (२५) असे डॉक्टरचे नाव असून, तो बदलापूर पूर्वेतील एका रुग्णालयात निवासी डॉक्टर म्हणून कार्यरत होता.

बदलापूर शहरात सोमवारी उत्तर प्रदेशमधील दहशतवादी विरोधी पथकाचे पोलीस उपअधीक्षक सुशील सिंग यांच्या नेतृत्वाखालील पथक दाखल झाले. त्यांनी स्थानिक पोलिसांच्या मदतीने कात्रप रस्त्यावर एका खासगी रुग्णालयात काम करणाऱ्या डॉ. ओसामा शेख याला अटक केली. परिमंडळ-४चे पोलीस उपायुक्त यांच्या मदतीने एटीएसने ही कारवाई केली.

दरम्यान, डॉ. शेख याला उल्हासनगर न्यायालयात हजर केले असता त्याला ८ ऑगस्टपर्यंत पोलीस कोठडी देण्यात आली आहे. यानंतर त्याला उत्तर प्रदेशला रवाना करण्यात आले आहे.

# लेखक डॉ. र. म. शेजवलकर यांचे निधन

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** लेखक, दंतवैद्य डॉ. र. म. शेजवलकर (७५) यांचे सोमवारी सायंकाळी निधन झाले. गेल्या सहा महिन्यांपासून ते कर्करोगाशी झुंज देत होते. त्यांच्या पश्चात पत्नी सुनीता शेजवलकर, तसेच मुलगा डॉ. पुष्कर, सून डॉ. पल्लवी, नातू नीलभ असा परिवार आहे.




डॉ. र. म. शेजवलकर यांनी नाटिका आणि एकांकिकाही लिहिल्या होत्या. दूरदर्शनवरील गजरा या कार्यक्रमातील काही भागांचे लेखन त्यांनी केले होते. त्यांची १७ पुस्तके प्रसिद्ध झाली. वाचनातील आगळेवेगळे, माझी दंतकथा हे कार्यक्रम ते करीत. ठाण्यातील विविध हौशी नाट्यसंस्थांमधून त्यांनी 'राजा जो जो रे', 'आली आली ही राधाबाई', 'ऐकतील पैलतीर', अशी नाटके लिहिली. 'पळता भुई थोडी' हा त्यांचा फार्स आय.एन.टी. संस्थेने व्यावसायिक रंगभूमीवर आणला होता. व्यवसायाने दंतवैद्य असलेल्या शेजवलकरांनी नाटककार आणि कादंबरीकार म्हणून कामगिरी बजावली होती. त्यांचे वाचन अफाट होते. आकाशवाणीवरील गाजलेल्या पुन्हा प्रपंच या मालिकेतील काही भागांचे लेखन त्यांनी केले होते.

मामा पेंडसे यांचे लेखनिक म्हणूनही त्यांनी काम केले होते. राज्यस्तरावरील तमाशा लेखन स्पर्धेत त्यांनी लोकनाट्य लिहून सातत्याने पारितोषिके मिळवली. आकाशवाणीवर 'आंबट गोड' या मालिकेचे अनेक भाग त्यांनी लिहिले होते. 'रमथ' हा काव्यसंग्रह, 'वळचणीचं पाणी', 'चुपके चुपके', 'बिझनेस मॅरेज' या कादंबऱ्या अशी त्यांची साहित्यसंपदा आहे.

Sahitya Akademi | Ministry of Culture, Government of India

साहित्य अकादेमीने मान्य केलेल्या 24 भाषांतील लेखक व प्रकाशकांना **युवा पुरस्कार-2026** साठी त्यांचे ग्रंथ पाठवावेत म्हणून अकादेमी आवाहन करीत आहे. या भाषांतील भारतीय लेखक हे 1 जानेवारी 2026 पर्यंत 35 वर्षे किंवा त्यापेक्षा कमी वयाचे असावेत. हा **पुरस्कार रोख 50,000/-** इतक्या रकमेचा आहे. जन्मतारखेच्या दाखल्यासह ग्रंथ पाठविण्याची अंतिम मुदत दिनांक **31 ऑगस्ट 2025** आहे. जन्मतारखेच्या दाखल्याची साक्षांकित सत्यप्रत सोबत असल्याशिवाय हे ग्रंथ पुरस्कारासाठी स्वीकारले जाणार नाहीत. पुरस्काराच्या अधिक तपशीलासाठी कृपया अकादेमीची वेबसाइट- **www.sahitya-akademi.gov.in** बघावी.

Sd /-
(**सचिव**)
**साहित्य अकादेमी, नवी दिल्ली**



# करोनाकाळात अनाथ झालेल्या युवकाला १० लाख

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** करोनाकाळात अनेक लहान मुलांनी आपले पालक गमावले. या अनाथ मुलांच्या सुरक्षित भविष्यासाठी २०२१ साली केंद्र शासनाकडून 'पीएम केअर फॉर चिल्ड्रन योजना' घोषित करण्यात आली होती. या योजनेच्या निकषानुसार ठाण्यातील अमनजीत सिंग (२३) या तरुणाला त्याच्या शिक्षणासाठी १० लाखांचा निधी देण्यात आला आहे.

विशेष म्हणजे या योजनेची घोषणा झाल्यानंतर लाभ घेणारा अमनजीत हा महाराष्ट्रातील पहिला लाभार्थी ठरला असल्याची माहिती जिल्हा प्रशासनाच्या वतीने देण्यात आली. या योजनेतर्फे १८ वर्षाखालील अनाथ बालकांना शिक्षण, आरोग्य व भविष्यासाठी आर्थिक पाठबळ देण्याची तरतूद करण्यात आली. या योजनेंतर्गत लाभार्थी बालकाला २३ वर्षे पूर्ण झाल्यावर त्याच्या नावावर ठेवलेली १० लाख रुपयांची रक्कम एकरकमी देण्यात येते.

# व्ही. एन. देसाई रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागात बनावट डॉक्टर

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**मुंबई :** सांताक्रुझ येथील मुंबई महापालिकेच्या व्ही. एन.देसाई रुग्णालयात कंत्राटी पद्धतीने चालविण्यात येत असलेल्या अतिदक्षता विभागामध्ये मागील अडीच वर्षांपासून बनावट डॉक्टर कार्यरत असल्याची बाब उघडकीस आली आहे. विशेष म्हणजे, त्याच्या कागदपत्रांची तपासणी महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडून (एमएमसी) अडीच वर्षांनंतर करण्यात आल्यानंतर हा प्रकार उघडकीस आला.

मुंबई महापालिकेच्या उपनगरीय रुग्णालयांमधील अतिदक्षता विभाग हे कंत्राटदारांमार्फत चालविण्यात येत आहेत. या अतिदक्षता विभागामध्ये सेवा देणाऱ्या डॉक्टरांची नियुक्तीही कंत्राटदारामार्फतच करण्यात येते. व्ही. एन. देसाई या रुग्णालयामध्ये साई संजीवनी पॉलिक्लिनिक ॲण्ड नर्सिंग या कंत्राटदारामार्फत वैद्यकीय सेवा पुरविण्यात येत आहे. रुग्णालयाच्या अतिदक्षता विभागामध्ये ऑक्टोबर २०२२ पासून एक डॉक्टर कार्यरत होता. या डॉक्टरने आपण परदेशातून एमडी मेडिसिनचे शिक्षण पूर्ण केले असल्याचे सांगत एमएमसीची मान्यता मिळालेली कागदपत्रे सादर केली होती. मात्र या कागदपत्रांची पडताळणी रुग्णालय प्रशासनाकडून करणे अपेक्षित असतानाही त्याकडे दुर्लक्ष केले गेले. त्यामुळे ऑक्टोबर २०२२ पासून हा डॉक्टर देसाई रुग्णालयामध्ये सेवा देत होता.

# पदोन्नतीच्या प्रतीक्षेतील अधिकाऱ्यांना फटका

**मुंबई :** पदोन्नतीत आरक्षण देता येत नाही, असा उच्च न्यायालयाचा स्पष्ट निकाल असतानाही तो डावलून राज्य शासन ३६१ सहायक पोलीस निरीक्षकांना पोलीस निरीक्षकपदी पदोन्नती देण्याच्या तयारीत आहे. या निर्णयामुळे पदोन्नतीच्या प्रतीक्षेत असलेल्या खुल्या प्रवर्गातील ५०० हून अधिक पोलीस अधिकाऱ्यांसह शासनातील हजारो अधिकाऱ्यांना भविष्यात फटका बसणार आहे. महाराष्ट्र प्रशासकीय प्राधिकरणानेही (मॅट) अशा रीतीने दिलेल्या पदोन्नतीला आक्षेप घेतला.

२००४ मध्ये मागासवर्गीयांना नोकऱ्यांमध्ये ५२ टक्के आरक्षण ठेवण्याचा निर्णय जारी करण्यात आला. या शासन निर्णयानुसार अनुसूचित जाती- जमाती, विमुक्त व भटक्या जाती तसेच विशेष मागास प्रवर्गासाठी पदोन्नतीमध्ये ३३ टक्के आरक्षण सर्व टप्प्यावर लागू केले. या निर्णयाला शासकीय अधिकारी विजय घोगरे यांनी उच्च न्यायालयात आव्हान दिले. या याचिकेचा २०१७ मध्ये निकाल लागला व न्यायालयाने पदोन्नतीच्या वेळी आरक्षणाचा लाभ घेता येणार नाही, असे स्पष्ट केले.

# सुमिटोमो केमिकल इंडिया लिमिटेड

**CIN : L24110MH2000PLC124224**
**नोंदणीकृत कार्यालय :** बिल्डिंग नं. १, तळमजला, शांत मनोर सीएचएस लि., चक्रवर्ती अशोक 'एक्स' रोड, कांदिवली (पू.), मुंबई-४००१०१
**ईमेल :** investor.relations@sumichem.co.in; **वेबसाइट :** www.sumichem.co.in

## ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता अलेखापरीक्षित स्वतंत्र व एकत्रीकृत वित्तीय निष्कर्षाचा उतारा

(रु. मिलियनमध्ये)

| अ. क्र. | तपशील | स्वतंत्र | | | एकत्रीकृत | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता (अलेखापरीक्षित) | ३० जून २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता (अलेखापरीक्षित) | ३० मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिता (लेखापरीक्षित) | ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता (अलेखापरीक्षित) | ३० जून २०२४ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता (अलेखापरीक्षित) | ३१ मार्च २०२५ रोजी संपलेल्या वर्षाकरिता (लेखापरीक्षित) |
| १ | व्यवहारांकडील एकूण उत्पन्न (निव्वळ) | १०,४८०.६९ | ८,३१७.८४ | ३०,९०३.६९ | १०,५६७.७९ | ८,३८८.८७ | ३१,४८५.२४ |
| २ | करापूर्वी कालावधीकरिता निव्वळ नफा | २,४१८.९० | १,७२५.७६ | ६,७३९.८९ | २,४०५.९२ | १,७१०.५५ | ६,८०२.३५ |
| ३ | करानंतर कालावधीकरिता निव्वळ नफा | १,७९८.०६ | १,२८३.९१ | ५,०१९.४८ | १,७८०.९६ | १,२६६.९० | ५,०६४.४३ |
| ४ | कालावधीकरिता एकूण व्यापक उत्पन्न [कालावधीकरिता समाविष्ट नफा (करानंतर) आणि अन्य व्यापक उत्पन्न (करानंतर)] | १,७८५.३७ | १,२८८.९८ | ५,०१२.८९ | १,७६७.५३ | १,२७०.७७ | ५,०५४.६१ |
| ५ | भरणा केलेले इक्विटी भागभांडवल (दर्शित मूल्य रु.१०/- प्रति इक्विटी भाग) | ४,९९१.४६ | ४,९९१.४६ | ४,९९१.४६ | ४,९९१.४६ | ४,९९१.४६ | ४,९९१.४६ |
| ६ | मूलभूत व सौम्य केलेली कमाई प्रत्येकी रु. १०/- प्रति भाग [वार्षिकीकृत न केलेली] (रु.)* | *३.६० | *२.५७ | *१०.०६ | *३.५७ | *२.५४ | *१०.१३ |

**नोंद :**

१. कंपनीच्या संचालक मंडळाने त्यांच्या ०४ ऑगस्ट २०२५ रोजी घेण्यात आलेल्या सभेत ३० जून २०२५ रोजी संपलेल्या तिमाहीकरिता कंपनीच्या अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षास मंजुरी दिली आहे.

२. वरील उतारा सेबी (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स ॲण्ड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसकडे फाइल केलेल्या तिमाही वित्तीय निष्कर्षांचे सविस्तर प्रारूप आहे. लेखापरीक्षकांच्या मर्यादित परीक्षण अहवालासमवेत तिमाही वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप (यूआरएल : https://sumichem.co.in/investors-relations.php#Financials) या कंपनीच्या वेबसाइटवर उपलब्ध आहे. सदर प्रारूप याखाली तरतूद केलेला क्यूआर कोड स्कॅन करून प्राप्त करता येईल. तसेच www.nseindia.com व www.bseindia.com या स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाइटवरसुद्धा उपलब्ध आहे.

स्थळ : मुंबई
दिनांकित : ०४ ऑगस्ट २०२५

सुमिटोमो केमिकल इंडिया लिमिटेड
चेतन शाह
(व्यवस्थापन संचालक)
डीआयएन : ००४८८१२७

# ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड

GLOBAL EDUCATION LTD. Always A Step Ahead

**CIN - L80301MH2011PLC219291**
**नोंदणीकृत कार्यालय :** 205, दुसरा मजला जयसिंग बिझनेस सेंटर परिसर सीएचएसएल, सहार रोड,ब्लॉक सेक्टर पारसीवाडा, अंधेरी (ई), मुंबई –400099, महाराष्ट्र, भारत. **ई–मेल :** investorinfo@globaledu.net.in **फोन नं. :** 0712-6649395
**फॅक्स नं. :** 0712-6649396 **वेबसाईट :** www.globaledu.net.in

## 30 जुन 2025 रोजी संपलेल्या तिमाही समाप्तिचा स्वतंत्र / एकत्रित अलेखापरीक्षित परिणामांचा संक्षिप्त गोषवारा

(रूपये लाखात EPS वगळता)

| अ. क्रं. | तपशील | स्वतंत्र | | | | एकत्रित | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | तिमाही समाप्ति | | | वर्ष समाप्ति | तिमाही समाप्ति | | | वर्ष समाप्ति |
| | | 30-06-2023 (अलेखापरीक्षित) | 31-03-2023 (लेखापरीक्षित) | 30-06-2022 (अलेखापरीक्षित) | 31-03-2023 (लेखापरीक्षित) | 30-06-2023 (अलेखापरीक्षित) | 31-03-2023 (लेखापरीक्षित) | 30-06-2022 (अलेखापरीक्षित) | 31-03-2023 (लेखापरीक्षित) |
| 1. | प्रवर्तनातुन एकुण उत्पन्न | 1491.97 | 1571.27 | 1458.70 | 7143.58 | 1526.25 | 1716.41 | 1522.11 | 7541.44 |
| 2. | कालावधीसाठी (करपुर्व, अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबीपूर्वी निव्वळ नफा/तोटा) | 586.64 | 593.64 | 783.13 | 3395.24 | 548.43 | 637.00 | 786.76 | 3444.95 |
| 3. | कालावधीसाठी करपूर्व (अपवादात्मक आणि/किंवा अनन्यसाधारण बाबीनंतर निव्वळ नफा/तोटा) | 586.64 | 593.64 | 783.13 | 3395.24 | 560.10 | 572.11 | 908.76 | 3697.33 |
| 4. | कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा तोटा (अपवादात्मक आणि / किंवा अनन्यसाधारण बाबीनंतर) | 438.40 | 445.27 | 586.05 | 2520.50 | 421.74 | 427.66 | 706.53 | 2808.67 |
| 5. | कालावधीसाठी एकुण व्यापक उत्पन्न [कालावधीसाठीचा नफा / तोटा) समाविष्ट करून (करोत्तर) आणि इतर व्यापक उत्पन्न (करोत्तर)] | 438.40 | 444.20 | 586.05 | 2519.43 | 421.74 | 426.59 | 706.53 | 2807.60 |
| 6. | भरणा केलेले समभाग भांडवल (दर्शनी मुल्य रू.2/- प्रति समभाग) | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 | 1018.03 |
| 7. | भरणा केलेल्या समभागा प्रति प्राप्ती (प्रत्येकी रू. 2/- च्या) अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी (समभाग प्रति प्राप्तीचे वार्षिकीकरण केलेले नाही.) | 0.86 | 0.87 | 1.15 | 4.95 | 0.83 | 0.83 | 1.39 | 5.54 |
| 8. | भरणा केलेल्या समभागा प्रति प्राप्ती (प्रत्येकी रू. 2/- च्या) समायोजीत अखंडित आणि खंडित प्रवर्तनासाठी (समभाग प्रति प्राप्तीचे वार्षिकीकरण केलेले नाही.) | 0.86 | 0.87 | 1.15 | 4.95 | 0.83 | 0.83 | 1.39 | 5.54 |

**नोट**

अ) वरील निर्देशित विवरण हे भारतीय प्रतिभूती व विनिमय मंडळ (सूची अनिवार्यता व विमोचन आवश्यकता) विनियमन 2015 च्या विनियमन 33 अंतर्गत स्टॉक एक्सचेंजेसकडे दाखल करण्यात आलेल्या दि. 30 जुन 2025 रोजी संपलेली तिमाही (स्वतंत्र व एकत्रित) निष्कर्षांच्या विस्तृत प्रारूपाचा सारांश आहे. दि. 30 जुन 2025 रोजी संपलेली तिमाही वर्षाकरिताच्या स्थायी अलेखापरीक्षित वित्तीय निष्कर्षांचे संपूर्ण प्रारूप नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडची वेबसाइट www.nseindia.com वर उपलब्ध आहे तसेच ती कंपनीची वेबसाइट (www.globaledu.net) वर उपलब्ध आहेत.

ब) मागील संबंधित कालावधीचे आकडे पुनर्गठित केले गेले आहेत आणि आवश्यक वाटेल तेथे पुनर्रचना केली गेली आहे.

क) वरील वित्तीय निष्कर्षाचे लेखापरीक्षण समितीद्वारे पुनरावलोकन करण्यात आले असून कंपनीच्या संचालक मंडळाद्वारे त्यांच्या सोमवार दि. 4 ऑगस्ट 2025 रोजी आयोजित सभेमध्ये त्यांना मंजुरी देण्यात आली आहे.

**संचालक मंडळाच्या आदेशानुसार**
**ग्लोबल एज्युकेशन लिमिटेड करिता**
**सही/-**
**आदित्य भंडारी, पुर्ण कालीन संचालक**
**DIN : 07637316**

**ठिकाण :** नागपुर
**दिनांक :** 4 ऑगस्ट 2025

# थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड

**नोंदणीकृत कार्यालय :** ११वा मजला, मॅरेथॉन फ्युचरेक्स, एन. एम. जोशी मार्ग, लोअर परेल (पू), मुंबई - ४०० ०१३
**फोन नं.:** +९१-२२-४२४२ ७००० **फॅक्स:** +९१-२२-२३०२ २८६४ **संकेत स्थळ:** www.thomascook.in
**ई-मेल:** sharedept@thomascook.in **सीआयएन:** एल६३०४०एमएच१९७८पीएलसी०२०७१७

## सभासदांना ४८व्या सर्वसाधारण सभेची सूचना

**याद्वारे सूचना देण्यात येत आहे** की थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड ("कंपनी") च्या सदस्यांची ४८ वी वार्षिक सर्वसाधारण सभा ("एजीएम") **बुधवार, ३ सप्टेंबर २०२५** रोजी दुपारी ३.३० वाजता (IST) व्हिडिओ कॉन्फरन्सिंग ("व्हीसी")/इतर ऑडिओ व्हिज्युअल माध्यमे ("ओएव्हीएम") द्वारे आयोजित केली जाईल. कंपनी कायदा २०१३ ("अधिनियम"), सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया (लिस्टिंग ऑब्लिगेशन्स अँड डिस्क्लोजर रिक्वायरमेंट्स) रेग्युलेशन्स, २०१५ च्या तरतुदींनुसार, कॉर्पोरेट अफेयर्स मंत्रालय ("एमसीए") आणि सिक्युरिटीज अँड एक्सचेंज बोर्ड ऑफ इंडिया ("सेबी") द्वारे जारी केलेल्या संबंधित परिपत्रकांसह वाचली जाईल. एजीएमच्या सूचनेत नमूद केलेले व्यवसाय करण्यासाठी.

एमसीए आणि सेबीच्या परिपत्रकांनुसार, २०२४-२५ आर्थिक वर्षासाठी एकात्मिक वार्षिक अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने त्या सदस्यांना पाठवली जाईल ज्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड आणि सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड ("डिपॉझिटरीज")/एमयूएफजी इनटाइम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड ("आरटीए") मध्ये नोंदणीकृत आहेत. २०२४-२०२५ आर्थिक वर्षासाठी एकात्मिक वार्षिक अहवालासह वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेची भौतिक प्रत, त्यांची नावे, फोलिओ क्रमांक/डीपी आयडी आणि क्लायंट आयडी नमूद करून sharedept@thomascook.in वर विनंती करणाऱ्या सर्व सदस्यांना पाठवली जाईल. सदस्यांनी नोंद घ्यावी की वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल कंपनीच्या www.thomascook.in या वेबसाइटवर, स्टॉक एक्सचेंजेस म्हणजेच बीएसई लिमिटेडच्या वेबसाइट www.bseindia.com वर आणि नॅशनल स्टॉक एक्सचेंज ऑफ इंडिया लिमिटेडच्या वेबसाइट www.nseindia.com वर, नॅशनल सिक्युरिटीज डिपॉझिटरी लिमिटेड ("NSDL") च्या वेबसाइट www.evoting.nsdl.com वर आणि RTA च्या वेबसाइट https://in.mpms.mufg.com/ वर देखील उपलब्ध असतील.

सदस्य फक्त VC/OAVM सुविधेद्वारेच AGM ला उपस्थित राहू शकतात आणि सहभागी होऊ शकतात. AGM मध्ये सामील होण्याच्या सूचना AGM च्या सूचनेत दिल्या जातील. VC/OAVM द्वारे बैठकीला उपस्थित राहणाऱ्या सदस्यांची गणना कंपनी कायदा, २०१३ च्या कलम १०३ अंतर्गत कोरम मोजण्यासाठी केली जाईल.

कंपनी तिच्या सर्व सदस्यांना वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत नमूद केलेल्या सर्व ठरावांवर मतदान करण्यासाठी रिमोट ई-व्होटिंग सुविधा ("रिमोट ई-व्होटिंग") देखील प्रदान करत आहे. तसेच, कंपनी वार्षिक सर्वसाधारण सभेदरम्यान ई-व्होटिंग प्रणालीद्वारे मतदान करण्याची सुविधा प्रदान करत आहे. रिमोट ई-व्होटिंग/ई-व्होटिंगची तपशीलवार प्रक्रिया वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेत प्रदान केली जाईल.

**आर्थिक वर्ष २०२४-२५ साठी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त करण्यासाठी आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करण्यासाठी ई-मेल पत्ते नोंदणी करण्याची प्रक्रिया:**

**अ. आरटीएकडे ई-मेल पत्त्यांची नोंदणी:** ज्यांना २०२४-२५ च्या आर्थिक वर्षासाठी वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना आणि वार्षिक अहवाल इलेक्ट्रॉनिक पद्धतीने प्राप्त करायचा आहे आणि इलेक्ट्रॉनिक पद्धतीने मतदान करायचे आहे अशा सदस्यांच्या (इलेक्ट्रॉनिक किंवा भौतिक स्वरूपात शेअर्स असलेले) ई-मेल पत्त्यांची नोंदणी करण्यासाठी कंपनीने आरटीएकडे विशेष व्यवस्था केली आहे. ज्या पात्र सदस्यांचे ई-मेल पत्ते कंपनी/डीपीकडे नोंदणीकृत नाहीत त्यांनी आरटीएकडे ते नोंदणीकृत करणे आवश्यक आहे.

**ब. ई-मेल पत्त्याच्या नोंदणीसाठी (भौतिक स्वरूपात किंवा इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असलेल्या शेअर्ससाठी) खालील प्रक्रिया अवलंबावी लागेल:**

अ. https://web.in.mpms.mufg.com/EmailReg/Email_Register.html या लिंकला भेट द्या.
ब. ड्रॉपडाऊनमधून कंपनीचे नाव निवडा: **थॉमस कुक [इंडिया] लिमिटेड**
क.संबंधित क्षेत्रात तपशील प्रविष्ट करा जसे की डीपी आयडी आणि क्लायंट आयडी (जर शेअर्स इलेक्ट्रॉनिक स्वरूपात असतील)/फोलिओ क्रमांक आणि प्रमाणपत्र क्रमांक (जर शेअर्स भौतिक स्वरूपात असतील), शेअरहोल्डरचे नाव, पॅन, मोबाईल नंबर आणि ई-मेल आयडी.
ड.सिस्टम मोबाईल नंबर आणि ईमेल आयडीवर वन टाइम पासवर्ड ("OTP") पाठवेल.
ई.मोबाईल नंबर आणि ईमेल आयडीवर आलेला ओटीपी एंटर करा आणि सबमिट करा.
फ.त्यानंतर सिस्टम एजीएमची सूचना आणि वार्षिक अहवाल २०२४-२५ च्या मर्यादित सेवेसाठी ई-मेल पत्त्याची पुष्टी करेल.

ई-मेल पत्ता यशस्वीरित्या सबमिट केल्यानंतर, एनएसडीएल ई-व्होटिंग वापरकर्ता आयडी आणि पासवर्डसह आर्थिक वर्ष २०२४-२५ च्या वार्षिक सर्वसाधारण सभेच्या सूचनेची आणि वार्षिक अहवालाची एक प्रत ईमेल करेल. कोणत्याही शंका असल्यास, सदस्य evoting@nsdl.co.in वर लिहू शकतात.

**लाभांश आदेश:**

सेबीने डिपॉझिटरीजनी दिलेले खाते तपशील आणि आरटीएने राखलेल्या बँक खात्याच्या तपशीलांचा वापर सदस्यांना इलेक्ट्रॉनिक पद्धतीने लाभांश देण्यासाठी करणे अनिवार्य केले आहे. भौतिक स्वरूपात शेअर्स धारण करणाऱ्या भागधारकांना सेबीच्या आवश्यकतांनुसार त्यांच्या फोलिओमध्ये केवायसी तक्रार असल्यास इलेक्ट्रॉनिक पद्धतीनेच लाभांश दिला जाईल आणि म्हणूनच त्यांना वेळेवर लाभांश मिळविण्यासाठी इलेक्ट्रॉनिक क्लिअरिंग सिस्टम (ईसीएस) मोड निवडण्याची विनंती केली जाते.

**पॅन आणि इतर तपशीलांचे अपडेट:** सेबीने ३ नोव्हेंबर २०२१ आणि १४ डिसेंबर २०२१ रोजीच्या त्यांच्या परिपत्रकाद्वारे, भौतिक सिक्युरिटीज धारकांना कोणत्याही गुंतवणूकदार सेवेचा लाभ घेण्यासाठी पॅन, केवायसी (म्हणजेच, पिन कोडसह पोस्टल पत्ता, ई-मेल पत्ता, मोबाईल नंबर, बँक खाते तपशील) आणि नामांकन तपशील देणे अनिवार्य केले आहे. वरीलपैकी कोणताही तपशील नोंदणीकृत नसलेले फोलिओ गोठवले जातील. म्हणून संबंधित सदस्यांना पॅन, केवायसी (म्हणजेच पिन कोडसह पोस्टल पत्ता, ई-मेल पत्ता, मोबाईल नंबर, बँक खाते तपशील) आणि नामांकन तपशील त्यांच्या नोंदणीकृत ई-मेल आयडीवरून kyc1@in.mpms.mufg.com या ईमेल पत्त्यावर योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला फॉर्म ISR-1 सबमिट करून किंवा नोंदणीकृत धारकांनी योग्यरित्या भरलेला आणि स्वाक्षरी केलेला विहित फॉर्मची भौतिक प्रत आमच्या RTA, **MUFG Intime India Private Limited**, C-१०१, पहिला मजला, २४७ पार्क, लाल बहादूर शास्त्री मार्ग, विक्रोळी (पश्चिम), मुंबई - ४०००८३ या पत्त्यावर पाठवून सादर करण्याचे आवाहन करण्यात येते. फॉर्म ISR-1 चे स्वरूप कंपनीच्या वेबसाइटवर https://www.thomascook.in/shareholder-forms वर उपलब्ध आहे.

**थॉमस कुक (इंडिया) लिमिटेड करीता**
**सही/-**
**अमित जे. पारेख**
**कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी**
**एसीएस: १३६४८.**

**ठिकाण: मुंबई**
**दिनांक: ऑगस्ट ५ ,२०२५**